# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.11.2025** **वार- शुक्रवार**

---

**<u>निवडणूक-सर्वोच्च न्यायालय</u>**

ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची अधिसूचना आधीच जारी झाली आहे, त्या निवडणुका ठरलेल्या तारखांना घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं परवानगी दिली आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी २१ जानेवारी रोजी होणार आहे. दरम्यान, ज्या ठिकाणी ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देण्यात आलं आहे तिथल्या निवडणुकांचा निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर अवलंबून राहील असं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

**<u>निवडणूकसुट्टी</u>**

पुणे जिल्ह्यात ज्या ठिकाणी नगरपरिषद आणि नगरपचांयतीच्या सार्वत्रिक निवडणूका होणार आहेत तिथं २ डिसेंबरला सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी ही माहिती दिली.

या निवडणुकीसाठी प्रचाराची मुदत वाढवण्यात आली असून आता १ डिसेंबरपर्यंत प्रचार करता येईल असा आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

निवडणुकांमुळं राज्यातल्या सर्व विद्यापीठांनी १ ते ३ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या सर्व परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्याचे निर्देश उच्च शिक्षण विभागानं दिले आहेत. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानं यादरम्यान होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत.

**<u>महात्माफुले</u>**

थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी आज महापालिकेतील फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

**<u>समतापुरस्कार</u>**

महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीनं आज पुण्यात ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांना महात्मा फुले समता पुरस्कार प्रदान करण्यात आला. माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाहा यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. आर्थिक आणि शैक्षणिक विषमता दूर करण्यासाठी महात्मा फुले यांनी आयुष्य वेचलं. पण, दुर्दैवाने ती समस्या अजूनही कायम आहे अशी खंत थोरात यांनी यावेळी व्यक्त केली.

**<u>सुरक्षानंबरप्लेट</u>**

केंद्र सरकार आणि राज्य सरकारनं खाजगी वाहनांना उच्च सुरक्षा नंबर प्लेट बसवणं बंधनकारक केलं आहे. पुणे शहरात अजूनही पंधरा लाख वाहनांना नंबर प्लेट बसवणं बाकी आहे. यासाठी मुदतवाढ द्यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य वाहन चालक-मालक आणि प्रतिनिधी महासंघाचे अध्यक्ष  डॉ. बाबा शिंदे यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

**<u>अतिवृष्टीमुळंद्राक्षहंगामवाया</u>**

पुण्यातील जुन्नर तालुक्यात अतिवृष्टीमुळं द्राक्ष बागांमध्ये पीक न आल्यामुळे हंगाम वाया गेला आहे. यामुळं द्राक्ष उत्पादक आर्थिक विवंचनेत आहेत. नवीन द्राक्ष बागा उभारणीसाठी पॅकेज जाहीर करावं, अशी मागणी महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे संचालक संदीप वारुळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.

**नदीमहोत्सवाचंआयोजन**

मुठा नदीपात्राची स्वच्छता करण्यासाठी पुणे महापालिकेतर्फे उद्या 'नदी महोत्सव, स्वच्छ नदी सुंदर पुणे ' उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. याअंतर्गत म्हात्रे पूल ते भिडे पुलादरम्यान नदीपात्राची स्वच्छता करण्यात येणार आहे. प्लास्टिक वापर टाळा, कचरा नदीत फेकू नका आणि नदीकाठ स्वच्छ ठेवा असं आवाहन पुणे महानगरपालिकेनं केलं आहे.

**अभिनेतेमुकेशखन्ना**

युद्ध हे कोणत्याही समस्येवर उपाय नाही. अहिंसा आणि विश्वशांतीसाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणं गरजेचं आहे असं मत अभिनेते मुकेश खन्ना यांनी व्यक्त केलं. पुण्यातल्या एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या संत श्री ज्ञानेश्वर आणि संत श्री तुकाराम महाराज स्मृती व्याख्यानमालेत ते आज बोलत होते.

**भारत-जपानबिझनेसमीट**

उद्या पुण्यात भारत जपान व्यवसाय परिषद होणार आहे. प्रोग्रेसिव्ह कौन्सिल ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री या संस्थेनं ही परिषद आयोजित केली आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. भगवान गवई यांनी ही माहिती दिली. टोकियो इथल्या व्हानेज लिमिटेडचे सीईओ डॉ. प्रमोद वाहने या परिषदेत भारत-जपान व्यावसायिक सहकार्यावर मुख्य भाषण देतील.

**निधन**

पुणे महापालिकेच्या माजी नगरसेविका लीना पानसरे यांचं नुकतंच पुण्यात निधन झालं. त्या साठ वर्षांच्या होत्या. पानसरे या २००७ ते २०१२ पर्यंत कोथरूडमधील रामबाग कॉलनी भागातून नगरसेवक म्हणून निवडून आल्या होत्या.

**हवामान-आयएमडी**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३० तर किमान १३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्या किमान तापमानात काहीशी घट होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**